महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
Email : cgmp@mahadiscom.in
Website : www.mahadiscom.in

क्र.मासंवि/रवका/न.क्र.१२/ 29635
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
प्रकाशगड, ४ था मजला, प्लॉट नं.जी-९,
प्रो.अनंत काणेकर मार्ग, स्टेशन रोड,
बांद्रा (पुर्व), मुंबई - ४०० ०५१.
दुरध्वनी क्रमांक : ०२२- २६४७५९९५
फॅक्स क्रमांक ०२२-२६५८०६४२

**दिनांक : २७ / ०७ /२०१२**

# परिपत्रक

विषय : **रामकृष्ण हॉस्पिटल, कोल्हापूर** या रुग्णालयाचे नाव कंपनीच्या मान्यताप्राप्त रुग्णालयाच्या यादीतून वगळणेबाबत.

संदर्भ : १) सा.आ.क्र.२०(क) दि.१७.०६.१९६३
२) प्रशासकीय परिपत्रक क्र.१७६ दि.३०.०९.२००८

.....

प्रशासकीय परिपत्रक क्र.१७६ दि.३०.०९.२००८ अन्वये पोटाचे विकार या आजारावरील उपचार/शस्त्रक्रिया करून घेण्यासाठी रामकृष्ण हॉस्पिटल,कोल्हापूर या रुग्णालयाचे नाव कंपनीच्या मान्यताप्राप्त सूचीवर घेण्यात आले होते. त्याची मुदत दि.२८.०९.२०११ रोजी संपल्याने या कार्यालयाने मे.रामकृष्ण हॉस्पिटल, कोल्हापूर यांच्याकडे नवीन दरांबाबत विचारणा केली होती. रामकृष्ण हॉस्पिटल, कोल्हापूर यांनी सरासरी २५ % दरवाढ प्रस्तावित केली असून दरवाढीमध्ये कोणत्याही प्रकारची तडजोड करण्यास नकार दिलेला आहे. त्यामुळे सदर रुग्णालयास कंपनीच्या मान्यताप्राप्त सूचिमधून वगळण्याचा प्रस्ताव कंपनीच्या विचाराधीन होता.

२. आता, मा.व्यवस्थापकीय संचालक यांनी वैद्यकीय सल्लागार व कार्यकारी संचालक (मासं) यांच्याशी विचारविनिमय करून रामकृष्ण हॉस्पिटल, कोल्हापूर यांचे नाव कंपनीच्या मान्यताप्राप्त रुग्णालयाच्या यादीतून वगळण्यास मंजुरी दिली आहे.

३. सदर परिपत्रक निर्गमित केलेल्या तारखेपासून अंमलात येईल.

४. सदर परिपत्रक कंपनीच्या इंट्रानेटवर उपलब्ध करण्यात आले आहे.

27/7/12

*( संदेश ए. हाके )*
*मुख्य महाव्यवस्थापक (मासं)*

*D:\O&M\Hospitals\Circular- Ramkrushna Hospital, Kholhapur.doc*
*27/07/2012*